


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २१७ ●गुरूवार,दि.०६ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955






# आमचं सरकार असतं तर शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू येऊ दिले नसते: उद्धव ठाकरे

## कर्जमुक्ती केली तरच येणाऱ्या निवडणुकीत मतदान करू असे ठाम पणे सांगा. संपूर्ण कर्जमुक्ती झालीच पाहिजे, अशी आमची मागणी आहे

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आणि मी मुख्यमंत्री असताना कोणत्याही अटीशर्तीशिवया आम्ही शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंतची कर्जमुक्ती दिली होती. आज आपलं सरकार असतं तर मी शेतकऱ्यांना रडू दिलं नसतं, त्यांच्या डोळ्यात अश्रू येऊ दिले नसते, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी दगाबाज सरकारला जाब विचारा, असे आवहन केले. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती आणि हेक्टरी पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत या मागणीसाठी शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मराठवाडा दौऱ्यावर आले आहेत. चार दिवस मराठवाड्यातील आठ जिल्हे, तालुक्यातील आठशेहून अधिक शेतकऱ्यांशी ते संवाद साधणार आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठणच्या नांदर गावात शेतकऱ्यांशी संवाद साधल्यानतर ठाकरे बीड जिल्ह्यातील पाली गावात पोहचले. तिथे त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना



### ● धीर सोडू नका ; दगाबाजांना जाब विचारा

**शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. इतिहासातली सर्वात मोठी भरपाई ही मोठी थाप आहे. राज्य शासनाला शेतकऱ्यांची थट्टा करायला लाज वाटत नाही. राज्य सरकार दगाबाज आहे, त्यामुळे दगाबाज लोकांशी दगाबाज करण्यात काहीही गैर नाही. शेतकरी राजा रडतोय, त्याला नुकसान भरपाई मिळत नाही. विमा तर बंदच केला आहे. शेतकरी विमा भरतो तेवढाही विमा मिळत नाही. या दगाबाज सरकारच्या विरोधात आपल्याल लढा द्यायचा आहे, कोणीही धीर सोडू नका, आम्ही तुमच्या सोबत आहोत, अशी ग्वाही उद्धव ठाकरे यांनी धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांशी संवाद साधताना दिली.**

महायुती सरकारवर टीका केली. मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीचा मुहूर्त जून मध्ये काढला आहे. निवडणूकीपर्यंत घरातील सर्व महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळत होता आता अनेक अटी लावून लाभार्थी कमी केले जात आहे. हे दगाबाजीतून आणि मतचोरीतून सत्तेवर आलेले सरकार आहे. राज्य काय किंवा केंद्र काय? ▶▶ उर्वरित पान २ वर

# आरोग्य विभागाकडून ३५०० जागांची जाहिरात, एन टी प्रवर्गासाठी एकही जागा नाही?

**● जाहिरात स्थगित करून सर्वसमावेशक जाहिरात काढण्याची धनंजय मुंडे यांची मागणी**
**● मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे पत्राद्वारे केली मागणी**

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारने ०४ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत समूदाय आरोग्य अधिकारी (कंत्राटी) पदाच्या सुमारे २००० तर वैद्यकीय अधिकारी (गट अ) पदाच्या १४४० जागांसाठी स्वतंत्र जाहिराती प्रसिद्ध केल्या असून यातील समूदाय आरोग्य अधिकारी पदाच्या २००० जागांमध्ये एन टी डी प्रवर्गासाठी एकही जागा आरक्षित करण्यात आलेली नाही तर वैद्यकीय अधिकारी भरतीच्या १४४० जागांमध्ये एन टी प्रवर्गातील अ,ब,क,ड पैकी एकही



प्रवर्गासाठी एकही जागा आरक्षित करण्यात आलेली नाही, हा या प्रवर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय असून या दोन्हीही जाहिराती स्थगित करून नव्याने सर्वसमावेशक जाहिरात प्रसिद्ध करण्यात यावी अशी विनंती माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे केली आहे.

धनंजय मुंडे यांनी या संदर्भात एक्स पोस्टव्दारे माहिती दिली असून त्यांनी याबाबतचे विनंती पत्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना पाठवले आहे. राज्यभरात या प्रवर्गातील लाखो विद्यार्थी असून ते या पदांसाठी प्रयत्न करत आहेत. या पदासाठी इच्छुक असलेल्या एन टी ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्हा रुग्णालय आहे की चोरांचा अड्डा?

## दिवसाढवळ्या रुग्णालयातिल पोलीस चौकी समोरून दुचाकी चोरीस. सुरक्षा रामभरोसे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील शासकीय रुग्णालय परिसरात चोरट्यांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत असून, नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. रुग्णालया समोरील पोलिस चौकीच्या अगदी मागे उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. ४) दुपारी दोनच्या सुमारास घडली.

दिनांक ३ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास रुग्णाला भेटण्यासाठी आलेले इम्रान काझी रा.मोमीनपुरा यांची दुचाकी क्रमांक




MH23 H 9819 ही दुचाकी जिल्हा रुग्णालयातील पोलीस चौकी समोर लावून रुग्णालयात गेले होते. काही वेळातच परत येताच दुचाकी गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ पोलिसात तक्रार दाखल केली. मात्र, या घटनेने बीड पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. चौकीसमोर चोरी, मग नागरिक कोणाच्या भरोशावर? असा प्रश्न सर्वसामान्यला पडला आहे. रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळच पोलिस चौकी असतानाही दिवसाढवळ्या अशी चोरी होणे हे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे आणि पोलिसांच्या अकार्यक्षमतेचे ठळक उदाहरण आहे. मागील काही महिन्यांपासून शहरात चोरीच्या घटनांची मालिका सुरु असून, आता ती सरकारी संस्थांपर्यंत ▶▶ उर्वरित पान २ वर

# नगरपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादीचे उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास मुदतवाढ; 7 नोव्हेंबरपर्यंत अर्ज दाखल करण्याचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**


बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास शहरातील कार्यकर्त्यांचा मोठा उत्साह दिसून येत आहे. कार्यकर्त्यांच्या वाढत्या प्रतिसादाचा विचार करून पक्षाच्या उच्चस्तरीय निर्देशानुसार अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. आता इच्छुकांना ७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी दिली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी अर्ज भरून घ्यावेत : आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

## 6 तारखेस फॉर्म भरणे, 7 आणि 8 तारखेला मुलाखती

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्याअनुषंगाने बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाच्या उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी दि.६ नोव्हेंबर रोजी, इच्छुक उमेदवारी अर्ज भरून घ्यावेत असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्याकडून करण्यात आले आहे. दरम्यान ▶▶ उर्वरित पान २ वर



**असे आहे इच्छुक उमेदवारांसाठी पक्षाकडील वेळापत्रक**

▶ दि. ६ नोव्हेंबर २०२५ - राष्ट्रवादी भवन, बीड येथे सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत आपला इच्छूक उमेदवारी अर्ज भरून जमा करणे.
▶ दि. ७ नोव्हेंबर - प्रभाग क्रमांक. २,३,४,५,६,७,१९,२०,२१,२२,२३,२४,२६ या प्रभागांतून नगरसेवक उमेदवारांसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती ▶ दि. ८ नोव्हेंबर - प्रभाग क्रमांक. १,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,२५ या प्रभागांतून नगरसेवक उमेदवारांसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती ▶ दि. ७ नोव्हेंबर व ८ नोव्हेंबर या दोन्ही दिवशी नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती होतील.

# नगरपरिषदांच्या निवडणुकीदरम्यान आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन केले जाईल : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने कालच राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीचा सार्वत्रिक निवडणुका २०२५ चा कार्यक्रम जाहीर केला असून , या निवडणुका पारदर्शक , शांततामय आणि कायद्याचे काटेकोर पालन करून पार पाडण्यासाठी बीड जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे . निवडणूक आयोगाने जारी केलेल्या आदेशानुसार आचारसंहिता लागू झाली असून , निवडणुकीशी संबंधित सर्व प्रक्रिया आता अधिकृतपणे सुरू झाल्या आहेत .

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी



विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी , पोलीस विभाग , नगरपरिषद प्रशासन आणि उमेदवारांना कायद्याचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे . त्यांनी सांगितले की , स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक म्हणजे लोकशाहीचा पाया आहे . या प्रक्रियेत पारदर्शकता , शिस्त आणि शांतता राखणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे . नागरिकांनी निर्भयपणे मतदान करावे आणि प्रशासनास सहकार्य करावे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी , तहसीलदार आणि नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांसोबत समन्वय बैठक घेतली . त्यांनी सांगितले की , निवडणुकीच्या काळात शिस्तभंग होणार नाही याची खात्री करण्यासाठी सर्व ▶▶ उर्वरित पान २ वर

# डॉ.योगेश क्षीरसागरांच्या आवाहनानंतर रा.काँ. पक्षाकडे इच्छुकांचे दीडशेहून अधिक अर्ज

## बीड शहरात रा.काँ.पक्षाला उत्स्फूर्त प्रतिसाद ; नगराध्यक्षपदासाठी १५ हून अधिक इच्छुक



**बीड । प्रतिनिधी**

आगामी बीड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने डॉ.योगेश क्षीरसागर यांनी नगराध्यक्ष, नगरसेवकपदासाठी इच्छुक ▶▶ उर्वरित पान २ वर

**डॉ.योगेश क्षीरसागर यांचे संघटन मजबूत– उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन मजबूत केलेले आहे. तसेच, इच्छुकांच्या अर्ज संख्येवरून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.**




# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा : बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाचा मोठा निर्णय - हेक्टरी ₹ 10,000 मदत मिळणार

**बीड । प्रतिनिधी**

जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले . शेतीपिकांचे , फळबागांचे , घरांचे , जनावरांचे तसेच वैयक्तिक व सार्वजनिक मालमत्तेचे झालेले प्रचंड नुकसान लक्षात घेऊन राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे . महसूल व वन विभागाने दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार , बीड जिल्ह्यासह छत्रपती संभाजीनगर विभागातील शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ₹ १०,००० या दराने विशेष आर्थिक मदत ( विशेष हंगामी मदत ) देण्यात येणार आहे .

सदर शासन निर्णयानुसार छत्रपती संभाजीनगर विभागात एकूण ₹ २८९७.८७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून , त्यापैकी बीड जिल्ह्यासाठी तब्बल ₹ ७०८ कोटी रुपयांची मदत निश्चित करण्यात आली आहे . या निधीच्या मदतीने बीड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी याबाबत तातडीने सर्व तहसीलदार , उपविभागीय अधिकारी , ▶▶ उर्वरित पान २ वर

# खोटे सोने बँकेला दिलं, फसवणूक करणारा सोनार गजाआड

### सोनाराला पुणे येथून अटक

**बीड । प्रतिनिधी**

सोन्यावर कर्ज ही स्कीम सर्व बँका आणि सर्व प्रायव्हेट फायनान्स कंपन्यांमध्ये चालू आहे. परंतु हा सोने तपासून देणाराच जर लफंगा असला तर बँक बुडालीच म्हणून समजा. बीड येथील अशाच एका सोनाराने स्वतः ग्राहक कर्ज घेण्यासाठी तयार केले. कर्जासाठी त्यांची निवेदन बँकेस पाठवली आणि त्यांना बनावट सोने तयार करून दिलं. अशा प्रकारे तयार केलेले सोने बँकेला तपासून देताना ते खरे आहे असे भासवले. बँकेने आंधळेपणाने विश्वास ठेवला आणि लोकांना भरमसाठ कर्ज वाटप केले. असे बनावट १६ ग्राहक बँक ऑफ



बडोदा या बँकेमध्ये या सोनाराने पाठवले आहेत. संशयिताचे नाव विलास उदावंत, राहणार पंडित नगर, नगर रोड, बीड, जो 'विलास ज्वेलर्स' नावाने बीड येथे दुकान चालवायचा. जलद श्रीमंत व्हायचे म्हणून त्याने हा उद्योग चालू केला आणि सामान्य लोकांकडूनही सोने गहाण ठेवा, पुढच्या महिन्यात तुम्हाला जास्त सोनं देतो, पैसे जमा करा, त्या बदल्यात जास्त सोनं देतो असे खोटे आश्वासन देऊन दोन महिन्यात सर्व मिळून अडीच कोटी रुपयांचे घबाड जमा केले आणि येथील प्रॉपर्टी विकून पसार झाला. बीड येथील सर्व संपर्क त्याने तोडून टाकला. यामध्ये बीड शहर पोलीस ठाण्यामध्ये ▶▶उर्वरितपान२वर



# महिला : शिक्षण, करिअरमधील अडथळे, सामाजिक दडपणे आणि विश्वकप विजेत्या

**आजच्या आधुनिक युगातही महिलांच्या शिक्षण आणि करिअरच्या प्रवासात अनेक अडथळे उभे आहेत. समाजाच्या परंपरा, रूढी, आणि चुकीच्या समजुती आजही काही प्रमाणात महिलांना त्यांच्या स्वप्नांपासून दूर ठेवतात. मुलींना घरातील जबाबदाऱ्यांमध्येच गुंतवून ठेवण्याची मानसिकता, 'करिअरपेक्षा लग्न महत्त्वाचं' अशी विचारसरणी, आणि सुरक्षिततेच्या भीतीमुळे अनेक मुली शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात मागे राहतात.**

## ● शिक्षणातील अडथळे

भारतातील ग्रामीण भागात अजूनही काही ठिकाणी मुलींच्या शिक्षणाला दुय्यम स्थान दिलं जातं. घरातील आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यास मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य मिळतं, मुलींचं शिक्षण मात्र थांबतं. शाळांमधील सुविधा, महिला शिक्षकांची कमतरता, आणि सुरक्षिततेचा अभाव हे सुद्धा प्रमुख अडथळे ठरतात.

## ● करिअरमधील संघर्ष

शिक्षण मिळाल्यानंतरही महिलांच्या करिअरमध्ये सामाजिक दडपण मोठं असतं. विवाहानंतर करिअर थांबवावं लागतं, मातृत्वानंतर नोकरी गमवावी लागते, आणि कार्यस्थळांवरील असमान वागणूक ही अजूनही वास्तवता आहे. घर आणि काम दोन्ही सांभाळणे हे जरी महिलांचं सामर्थ्य मानलं जातं, तरी त्यामागे त्यांना मिळणारा ताण आणि अपेक्षांचं ओझं अनेकदा दुर्लक्षित राहतं.






## ● सामाजिक दडपण

महिलांवर समाजाने लादलेले ठराविक चौकटीतील नियम त्यांची प्रगती रोखतात. महिलांनी एवढंच करावं, महिलांची जागा घरातच आहे या जुन्या मानसिकतेमुळे अनेक स्वप्नं अपुरी राहतात. मात्र आता काळ बदलतो आहे – नव्या पिढीतील तरुणी शिक्षण, विज्ञान, खेळ आणि तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रात पुढे येत आहेत.

## ● महिला विश्वकप विजेत्या खेळाडूंचं उदाहरण

अलीकडे झालेल्या महिला विश्वकप विजेत्या भारतीय संघाने हे दाखवून दिलं की, महिलांकडे प्रतिभा, जिद्द आणि क्षमता कमी नाही. समाजातील अडथळे, शंका, आणि दडपण पार करून त्यांनी जगात भारताचं नाव उज्ज्वल केलं. त्यांच्या विजयाने प्रत्येक भारतीय महिलेला प्रेरणा मिळाली की, योग्य संधी आणि पाठबळ मिळालं तर त्या कोणतीही उंची गाठू शकतात. महिलांचं शिक्षण आणि करिअर हे फक्त त्यांच्या व्यक्तीगत प्रगतीसाठी नसून, समाजाच्या विकासासाठी अत्यावश्यक आहे. शिक्षित आणि स्वावलंबी महिला म्हणजे समृद्ध समाजाची पायाभरणी. त्यामुळे आता वेळ आली आहे की आपण महिलांच्या पंखांना ओझं न ठरवता त्यांच्या स्वप्नांना उंच भरारी देऊ.

– शबनम मुजीब खान
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

◆ पान १ वरून पुढे...

## आमचं सरकार....

शेतकऱ्यांना हमी भाव मिळतो आहे का? याचे उत्तर मोदींनी द्यावे, असे सांगतानाच कर्जमाफीनंतर शेतकरी मतदान करतील, अशी भूमिका ठेवावी लागेल, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना केले. कर्जमुक्ती केली तरच येणाऱ्या निवडणुकीत मतदान करू असे ठाम पणे सांगा. संपूर्ण कर्जमुक्ती झालीच पाहिजे, अशी आमची मागणी आहे. जगातली सर्वात मोठे पॅकेज सांगणाऱ्यांनी नुकसान भरपाई कुठे आहे? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. देवेंद्र फडणवीस यांनी शिवाजी महाराज यांच्या नावाने सुरू केलेली कर्जमुक्ती शेतकऱ्यांना मिळालीच नाही. शेतकरी फुकट नव्हे तर हक्काची कर्जमुक्ती मागत आहे. सरकारच मत चोरी करून आले आहे तर त्यांना जाब विचारला गेलाच पाहिजे.

## आरोग्य विभागाकडून...

प्रवर्गातील अनेक विद्यार्थ्यांनी वरील अन्यायाबाबत आपल्याकडे तक्रारी केल्या असून, एकूण ३५०० जागांमध्ये एन टी प्रवर्गासाठी एकही जागा आरक्षित नसणे हा एक प्रकारे अन्याय असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. दरम्यान कोणत्याही प्रवार्गावर शासकीय नोकर भरतीमध्ये अन्याय होणार नाही, यासाठी या दोन्हीही जाहिराती राज्य सरकारने स्थगित कराव्यात व सर्वसमावेशक पद्धतीने नव्याने जाहिरात प्रसिद्ध करावी, अशी विनंती धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. यावर राज्य शासन काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

## बीड जिल्हा ...

पोहोचली आहे. बसस्थानक, बाजारपेठ आणि आता रुग्णालय – प्रत्येक ठिकाणी चोरट्यांनी आपला कहर मांडला आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, रुग्णालयात जीव वाचवायला येतो, पण बाहेर गाडी वाचेल का? असा सवाल सर्वत्र केला जात आहे. सीसीटीव्ही कॅमेरे सज्ज पण इन्व्हर्टर नसल्याने बंद! या घटनेतील आणखी एक लज्जास्पद बाब म्हणजे – पोलिस चौकीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांना इन्व्हर्टर कनेक्शनच नाही! त्यामुळे चोरीच्या घटनेचे फ

◆ पान १ वरून पुढे...

टेज मिळू शकलेले नाही. म्हणजेच, सुरक्षा साधने बसवली असली तरी ती केवळ शोभेची वस्तू ठरली आहेत. शहरातील सर्वात महत्त्वाच्या रुग्णालयाबाहेर अशी बेपर्वाई असणे हे प्रशासनाच्या निष्क्रियतेचे जिवंत उदाहरण ठरत आहे. प्रशासन बघ्याची भूमिका घेतंय – नागरिक मात्र भयभीत शहरातील नागरिक आता शासकीय रुग्णालयात वाहन नेण्यासही घाबरत आहेत. चोरट्यांना भीती नाही, पोलिसांना जबाबदारी नाही आणि नागरिकच रोजचे बळी – अशी भावना व्यक्त केली जात आहे. चोरी झाल्यानंतरही पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरु न करता नेहमीचा तपास सुरू आहे हा ठरलेला प्रतिसाद दिला.

## नगरपरिषद निवडणुकीसाठी...

अमर नाईकवाडे म्हणाले, नगरसेवक आणि नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल केले जात आहेत. पूर्वनिर्धारित अंतिम मुदत ५ नोव्हेंबर होती. मात्र, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच वरिष्ठ नेत्यांच्या सूचनेनुसार ही मुदत दोन दिवसांनी वाढवून ७ नोव्हेंबर करण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा कार्यालय, मित्र नगर, बीड येथे उपलब्ध असून, हे अर्ज कार्यालयीन सरचिटणीस महादेव धांडे यांच्याकडे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत जमा करायचे आहेत. अमर नाईकवाडे यांनी सर्व इच्छुक कार्यकर्त्यांना वेळेवर अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले असून, निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला मजबूत संघटित पद्धतीने उतरविण्यासाठी पक्षाची तयारी सुरू असल्याचेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

## नगरपरिषदांच्या ....

आचारसंहितेचे नियम प्रत्यक्ष अंमलात आणले जातील . आवश्यक असल्यास पोलीस आणि प्रशासनाचे संयुक्त पथक तत्काळ कारवाई करेल . अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे – सोनवणे यांनी सांगितले की , मतदान केंद्रांवरील सर्व सुविधा नागरिकांच्या सोयीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत . महिलांसाठी स्वतंत्र ओळी , दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ मतदान व्यवस्था यावर विशेष भर दिला जाईल . त्यांनी

◆ पान १ वरून पुढे...

सांगितले , निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव आहे , परंतु त्यात शिस्त आणि सामाजिक जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे . दरम्यान , बीड नगर परिषदेच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी नगरपरिषदेतील उमेदवारांना आवाहन केले की , परवानगीशिवाय कोणतीही सभा , मिरवणूक , मोर्चा किंवा ध्वनिवर्धक वापर करू नये . सर्व कार्यक्रमांसाठी पोलीस विभागाची आणि स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेणे बंधनकारक आहे . निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास कठोर कारवाई केली जाईल.

## डॉ.योगेश क्षीरसागरांच्या....

कार्यकर्त्यांकडून अर्ज मागविले होते. डॉ. क्षीरसागर यांच्या आवाहनानंतर बीड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकाच दिवसात दीडशेहून अधिक अर्ज पक्षाकडे दाखल झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कार्यकर्ते व इच्छुकांना नाममात्र शुल्क भरून अर्ज फॉर्म घेऊन जमा करण्याचे आवाहन केले होते. आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आतापर्यंत दीडशेहून अधिक इच्छुकांनी पक्षाकडे उमेदवारीसाठी अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी १५ हून अधिक इच्छुकांनी नगराध्यक्षपदासाठी अर्ज केले आहेत. या अर्ज प्रक्रियेद्वारे बीड शहरातील कार्यकर्त्यांसह नागरिकांचा कल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे असल्याचे स्पष्ट होत आहे.

## बीड नगरपरिषदेच्या....

नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाच्या इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती ७ नोव्हेंबर आणि ८ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी भवन, बीड यथे होणार आहेत.
२०२२ मध्ये कार्यकाळ संपुष्टात आलेल्या बीड नगरपरिषदेच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. दि.१० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज भरण्यात येणार असून २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. आणि लगेचच ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल लागणार आहे. निवडणूक आयोगाकडून हे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बीड शहरातील, राष्ट्रवादी

◆ पान १ वरून पुढे...

काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक उमेदवारांसाठी अर्ज आणि मुलाखतीचे वेळापत्रक ठरविण्यात आले आहे. त्यामुळे बीड शहरातील उमेदवारांनी पक्षाकडून विहित केलेले शुल्क भरून अर्ज घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आ.सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे. दरम्यान विहित मुदतीच्या नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नसल्याचेही पक्षाकडून सांगण्यात आले आहे.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना ....

कृषी विभाग , बँका आणि महसूल यंत्रणेला समन्वयाने काम करण्याचे आदेश दिले आहेत . त्यांनी म्हटले की – शेतकऱ्यांना मदतीचा लाभ मिळवून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे . कोणत्याही शेतकऱ्याचा अर्ज प्रलंबित राहू नये . मदतीचे थेट वितरण डिबीटी प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात करण्यात यावे . जिल्हाधिकारी यांनी डीबीटी पोर्टलवर माहिती अपलोड करण्याची , बँक खात्यांची पडताळणी पूर्ण करण्याची आणि विभागीय कार्यालयातून दररोज प्रगती अहवाल सादर करण्याची सूचना दिली आहे . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी यासाठी सविस्तर कार्ययोजना तयार केली आहे . त्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल सहाय्यक , तलाठी , कृषी सहाय्यक आणि ग्रामसेवक यांच्या संयुक्त पथकांद्वारे नुकसानग्रस्त शेतजमिनींचे प्रत्यक्ष पंचनामे पूर्ण झालेले असून , आता डेटा पडताळणी आणि ऑनलाइन प्रणालीत नोंदणीचे काम युद्धपातळीवर सुरू होणार आहे.

## खोटे सोने...

गुन्हा दाखल करण्यात आला. त्याने बीड येथील संपर्क तोडल्यामुळे त्याला शोधणे अवघड होते. परंतु गुप्त बातमीदाराने माहिती दिल्यानंतर त्याचा पुण्याचा पत्ता मिळाला. त्याने तेथेही सोने-चांदी विक्रीचे दुकान 'व्यंकटेश ज्वेलर्स' नावाने देहूगाव येथे चालू केले होते. त्याला तेथेच दुकानामध्ये बीड शहर पोलीस ठाण्याने नेमून दिलेल्या स्टाफकडून पकडण्यात आले आणि त्याच्या ताब्यातून १८ किलो चांदी जप्त करण्यात आली आहे. ज्या लोकांची फसवणूक केली होती त्या लोकांना यामुळे आता दिलासा मिळाला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## केंद्रीय पथकाचा...

वसीमा शेख, तहसीलदार चंद्रकांत शेळके, वैशाली पाटील, सुरेश घोळवे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आदींसह सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पथकाने आज बीड, आष्टी आणि शिरूर कासार तालुक्यांतील अतिवृष्टीग्रस्त भागांना भेट देत गावांमध्ये शेतजमिनीवरील गाळ, रस्त्यांवरील भगदाडे, नाले-ओढ्यांचे तुटलेले बांध, तसेच घरांची पडझड, विद्युत पुरवठा नुकसान आदी प्रकार पाहिले. पथकातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवादही साधला. राज्यातील खरीप हंगाम २०२५ मध्ये अतिवृष्टी, पूरस्थिती आणि नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे मूल्यमापन करण्यासाठी हे पथक जिल्ह्यात आले होते. जिल्ह्यात झालेल्या नुकसानीमध्ये शेतजमीन वाहून जाणे, धरणांचे पाणी ओसंडून वाहणे, दगावलेली जनावरे, घर व रस्ते यांचे नुकसान या सर्व बाबींची माहिती सकाळी शासकीय विश्राम गृह येथे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , जिल्हा अधीक्षक सुभाष साळवे यांनी केंद्रीय पथकास सविस्तर दिली

## तलवाडा जिल्हा....

निवडनुकिच्या आणुषंगाने जी गवगव या भागात जाणऊ लागली आहे या बाबतीत पक्ष पातळीवर व तालुका स्तरावर नेते मंडळींनी परत गाव व गट सलाईनवर राहणार नाही याची दक्षता घेऊन गु-हाळी चर्चेला पुर्ण विराम देत तलवाडा गावातीलच ऊमेदवार जिल्हा परिषद प्रतिनिधि म्हणून देऊन दोन्ही गणातील एक एक पंचायत समितिचा प्रतिनिधि म्हणून ऊमेदवार ध्यावा आस्या प्रकारची चर्चा होतांना ऐकावयास मिळत असुन मतदारातुन मिळत आसलेल्या प्रतिक्रियाच्या आणुषंगाने तालुका स्तरिय नेतृत्वाने तलवाडा जिल्हा परिषद गटाचा स्थानिक व सूझबूझ असणारा ऊमेदवार देऊन स्वताहच्या डोक्यात पेटलेला बॉयलर विझऊन तलवाडा गाव गट पुन्हा सलाईनवर राहणार नाही याची दक्षता घ्यावी आसे बोलल्या जाऊ लागले आहे.

## अखिल भारतीय...

रोहन गलांडे पाटील यांनी कुणबी मराठा महासंघाच्या संस्थापक अध्यक्ष शिवश्री प्रल्हाद दादा गुळभिले यांचे व सर्व वरीष्ठ पदाधिकारी यांचे आभार मानले आहेत,आयुष्यभर ऋणी राहीन असे मत व्यक्त केले आहे.तसेच रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले की संघाने माझी नियुक्ती आजपर्यंत केलेल्या कामाची दखल घेऊन केलेली आहे जसे की मराठा आरक्षणासाठी अमरण उपोषण तसेच सर्वसामान्य जनतेसाठी अनेक छोटे मोठे आंदोलने विकास कामे केले आहेत त्यांची दखल घेऊन मला अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे त्यामुळे मी यापुढेही असेच सर्वसामान्य जनतेसाठी सर्व जातिधर्मातील नागरिकांनसाठी कायम लढत राहील शेवटच्या श्वासापर्यंत व महाराष्ट्रात अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे संघटीकरण मोठ्या संख्येने करणार आहे असे वचन संस्थापक अध्यक्ष यांना दिले आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## माजलगावातील पेट्रोल...

मशीन दुरुस्तीशिवाय पडून असतात. मशीनची स्थिती पाहता असं जाणवतं की त्यांची नियमित तपासणीच होत नाही. मोफत हवा देण्याची ही सेवा प्रत्यक्षात बंधनकारक असूनही, अनेक पंप त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करत आहेत. संबंधित विभागाने यावर लक्ष ठेवणे अपेक्षित असतानाही आजवर कुठलीही कारवाई झाल्याचे दिसत नाही. जर मोफत हवा देणारे साधनच इतके निष्क्रिय असतील, तर इतर अत्यावश्यक सुरक्षा उपकरणांची स्थिती काय असेल? अग्निशामक यंत्रे, आपत्कालीन स्विच, सुरक्षा बॅरिअर, ही साधने तपासली जातात की नाही, याबाबतही प्रश्नचिन्ह आहे. अपघाताच्या प्रसंगी ही साधने 'रेडी' असतील का? असा नैसर्गिक प्रश्न ग्राहकांना पडतो. स्थानिक प्रशासन आणि पेट्रोलियम विभागाने याकडे दुर्लक्ष केलेले स्पष्ट दिसते. अनेक महिन्यांपासून पंपांवरील सेवा बंद असतानाही कोणी विचारपूस करत नाही. अशा निष्काळजीपणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष म्हणजे ग्राहक सुरक्षिततेचा व अधिकारांचा थेट अपमानच आहे.प्रत्येक पेट्रोल पंपाची तपासणी करून मोफत हवा सेवा तातडीने सुरू करावी आणि सुरक्षा साधनांची कार्यस्थिती सुनिश्चित करावी. अन्यथा अशा निष्क्रिय पंपांविरोधात कारवाई करावी कारण आज 'हवा' बंद आहे, उद्या सुरक्षा साधनंही बंद पडली तर त्याची किंमत जीव देऊन चुकवावी लागेल, अशी मागणी नागरीक करीत आहेत.

## शिवराजसिंह चौहान....

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन केले होते. त्याच काळात गणेश उत्सवात धनंजय मुंडे यांनी नट-नट्यावर कोट्यावधी रुपये उधळले होते.दिल्लीला परत जाताच शिवराजसिंह चौहान यांनी महाराष्ट्रातील पीक विमा योजनेत बदल करून वैयक्तिक पिक विमा नुकसान भरपाई मिळविण्याचे ट्रिगर बदलण्यास मंजुरी दिली.यावर्षी सलग पडलेल्या अतिपावसाने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. मात्र पिक विमा योजनेतील बदलामुळे शेतकऱ्यांना कसलाही फायदा होणार नाही.अशी शेतकरी विरोधी धोरणे राबविणाऱ्या शिवराजसिंह चौहान यांच्या शेतकरी संवाद मेळाव्याला जाऊन आपल्या पदरात काय पडणार आहे? याचा विचार शेतकऱ्यांनी करावा. ग्लोबल विकास ट्रस्टसारख्या स्वयंसेवी संस्थांच्या कामामुळे शेतकऱ्यांचा फायदा झाल्याची नोंद शेतकरी आत्महत्येवरील कुठल्याही अहवालात नाही.जी.व्ही.टी. ने वाटप केलेल्या फळ पिकांना विशेषतः सिताफळांच्या रोपांना तीन वर्षे उलटून सुध्दा फळधारणा झाली नाही. सीताफळीच्या बागा शेतकऱ्यांना उपटून काढाव्या लागल्या, सिरसाळा परिसरात तशा तक्रारी आहेत.यावर्षी बीड जिल्ह्यात आतापर्यंत राजेभाऊ शेप आणि सुर्यकांत शेप यासह सुमारे ३०० शेतकऱ्यांनी आत्म(हत्या) करून मृत्यूला कवटाळले आहे.शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शरद जोशी यांच्या टास्क फोर्सने तसेच डॉ.स्वामीनाथन समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी न करता तथाकथित स्वयंसेवी संस्थेच्या आडून शेतकऱ्यांना २०० कोटी रुपयांचे केळी आणि रेशीम शेतीसाठी कर्ज मिळवून देण्याचे आमिष

◆ पान ४ वरून पुढे...

दाखविण्यात येत आहे. या प्रकाराची चौकशी करावी. यावर्षी अति पावसाने जमिनी खरडून गेल्या आहेत, पशुधनाचे अतोनात नुकसान झाले आहे. मुला बाळांची शैक्षणिक फीस,दवाखाना, रब्बीच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांकडे पैसे नाहीत. देवेंद्र सरकारने घोषित केलेली मदत अनेकांना मिळालेली नाही. कांदा,भाजीपाला,केळी, दुधाचे दर कमालीचे घसरले आहेत. सोयाबीन, कापूस, तूर ,उडीद, मूग, ज्वारी, बाजरी, मका आदी. पिकांना बाजार समितीत आधारभूत किंमत मिळत नाही.

## शेतकऱ्याचे आर्थिक....

व संबंधित खरेदी-विक्री करणारे व्यापारी बाजारपेठवर पणन विभाग मार्फत शासनाकडून नियमानुसार कारवाई केली जात नाही . भाजप सरकारचे खते बी बियाणे कीटकनाशक औषधी शेती अवजारे विविध कर लावून शेतकऱ्याचे जीवन संपण्याचे मोठे कटकारस्थान आहे. शेतकऱ्यांनी देशांमध्ये वेगवेगळे जन आंदोलन न्याय हक्कासाठी उभे केले परंतु ते चिरडण्यासाठी शासकीय यंत्रणेचा दूर वापर करून ७०० पेक्षा जास्त शेतकरी मृत्युमुखी पडले अश्रु धुराचा वापर करून नळकांडे फोडले ,शेतकऱ्यावर लाठीचार्ज करून मारहाण केली पाईप द्वारे पाण्याचा शेतकऱ्यावर तुफान मारा केला इंटरनेट सेवा बंद केली रोडवर बॅरिकेट्स लावून खड्डे खोदून सिमेंट रोडवर खडी मोठे मोठे दगड लोखंडाच्या जाळ्या टाकून खिळे ठोकून रोड ब्लॉक केले . शेतकऱ्यांना दिल्लीमध्ये आंदोलनासाठी न येऊ देण्याचे मोठे कटकारस्थान सरकारने रचून शेतकऱ्याचे आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केला. तरी ही शेतकरी न्याय हक्कासाठी लढत राहिला परंतु भाजपच्या सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत . भाजपाचे सरकार शेतकऱ्यांसाठी कर्दनकाळ असून शेतकऱ्याचे जीवन संपण्याचे मोठे कटकारस्थान रचले जात आहे.आंदोलन चिरडण्यासाठी सर्व स्तराचा शासकीय यंत्रणेचा वापर करून शेतकऱ्यांच्या सायकल मोटरसायकल बैलगाडी ट्रॅक्टर टेम्पो जेसीबी इत्यादी वाहनांना जंतर-मंतर मैदानावर न येऊ देण्यासाठी सर्व स्तरावर शेडयंत्ररचून शेतकऱ्याचे जीवन संपण्याचे मोठे कटकारस्थान रचले पिक विमा व विविध शासनाचे अनुदाने शेतकऱ्याला वेळेवर दिले जात नाहीत

## चेक बाउन्स...

ऑफ इंडिया या बँकेचा चेक मेडीकलमध्ये देण्यात आला होता. यानंतर सदर चेक बँकेत वठविण्यास टाकला असता चेक बाउन्स झाला आणि फिर्यादीस पैसे मिळाले नाही. तसेच या कारणाने वकीलामार्फत कायदेशीर देखील नोटीस पाठविण्यात आलेली होती परंतु त्यास रुपेश शेळके यांनी प्रतिसाद दिला नाही. यामुळे श्री. माऊली मेडीकल अँड जनरल स्टोअर्सचे प्रोप्रायटर रामदास भानुदास राऊत यांच्यामार्फत रुपेश राजेंद्र शेळके यांच्याविरुद्ध बीड येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयात फौजदारी केस दाखल केली होती. सदर कोर्ट प्रकरणात फिर्यादीतर्फे सादर करण्यात आलेला सर्व साक्षीपुरावा व कागदपत्रे यामुळे सबळ पुराव्यानिशी चेक बाउन्स बाबत निगोशिएबल इंस्ट्रुमेंट

◆ पान ४ वरून पुढे...

क्टचे कलम १३८ अन्वये आरोपीने गुन्हा केल्याचा सिद्ध झाल्याने बीड येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दिनांक ३१-१०-२०२५ रोजी अंतिम निकालात आरोपी रुपेश राजेंद्र शेळके यांस दोन लाख पन्नास हजार रुपये दंड आणि सदरचा दंड न भरल्यास ३ महिने कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या चेक बाउन्स संबधीत फौजदारी केसमध्ये फिर्यादीतर्फे मुख्य वकील म्हणून ॲड. कपिलकुमार विष्णुपंत बेदरे यांनी न्यायालयात अत्यंत प्रभावीपणाने काम पाहिले व त्यांच्या मार्फत कोर्टात सादर करण्यात आलेला साक्षीपुरावा आणि अंतिम युक्तिवाद या केसमध्ये अत्यंत महत्वाचा ठरला. या केस दरम्यान ॲड. कपिलकुमार विष्णुपंत बेदरे यांना ॲड. अरविंद बन्सी काळकुटे, ॲड. सिद्धार्थ मधुकरराव वारे, ॲड. राजेश बागलाने यांनी सहकार्य केले.

## लोकशाही पत्रकार...

करताना जेष्ठ पत्रकार कचरे म्हणाले की, पत्रकारांनी एकजुटीने राहिले पाहिजे. एकमेकांचे उणे दुणे काढू नये एकमेकांना नावे न ठेवता. पत्रकारांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत. पत्रकारासाठी घरकुल सहित कॉम्प्लेक्स पाहिजे. यासाठी आपण मंत्रालय स्तरावर प्रयत्न करू. त्यानंतर संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य बोलताना म्हणाले की, लोकशाही पत्रकार संघ सलग्न विविध ७२ विकास समित्या काम करत आहेत. लोकशाही पत्रकार संघातील राज्याभरातील सर्व पदाधिकारी एक दिलाने, तन-मन-धन अर्पण करून काम करत आहेत. राज्यातील सर्व पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी मी स्वतः राज्यात दौरा करणार आहे. यावेळी सर्व पत्रकारांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी भरीव असे काम करणार आहे. शिवाय लवकरच बीड येथे विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले. व लोकशाही पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी नवनाथ अण्णा शिराळे (पाटील) यांची निवड जाहीर करतो असे ही यावेळी बीबी वैद्य म्हणाले. त्यांनतर डॉ. प्रा. सोपान सुरवसे, कैलास कुंभार,नितेश उपाध्ये, संजय कुलकर्णी, बाजीराव ढाकणे, शिवप्रसाद सिरसाट, बीड सह राज्यातून मित्र,व राजकीय नेते यांनी नवनियुक्त लोकशाही पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी नवनाथ अण्णा शिराळे (पाटील) यांना शुभेच्छा दिल्या. त्या नंतर कार्यक्रमाचा यांनी अध्यक्षीय समारोप बीबी वैद्य यांनी केला. यावेळी नवनाथ अण्णा शिराळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना नवनाथ अण्णा शिराळे म्हणाले की, बीड जिल्ह्यासह राज्यातील अनेक पत्रकार निर्भीडपणे पत्रकारितेचे काम करत आहेत. त्यामुळे समाजातील गोरगरीब सामान्य जनतेला न्याय मिळत आहे. बीड जिल्ह्यातील विशेषतः लोकशाही पत्रकार संघाच्या प्रत्येक पत्रकारांनी निर्भीडपणे अन्य अत्याचाराच्या विरोधात आपली लेखणी चालवावी. राज्यातील जिल्ह्यातील लोकशाही पत्रकार संघाच्या प्रत्येक पत्रकारांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे. यापुढेही मी आपल्या पाठीशी खंबीर उभा राहीन. प्रत्येकाला माझे सहकार्य राहील असे आश्वासन दिले. .

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# एआयएमआयएमच्या नेतृत्वाने बिहारमधील अमौर मतदारसंघात जोरदार प्रचार

## बीडचा भाऊ पुन्हा जबाबदारी सांभाळणारय ; बिहार तो झाकी है..!बीड भी अभी बाकी है...!

**हैदराबाद । प्रतिनिधी**

अखिल मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएम आयएम) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष बॅरिस्टर असदुद्दीन औवेसी साहेब यांच्या आदेशानुसार आणि प्रदेश अध्यक्ष तथा मा. खा. इम्तियाज जलील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाने बिहार विधानसभा निवडणुकीसाठी (२०२५) प्रचारयंत्रणेला वेग दिला आहे. प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर (औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष) आणि मराठवाडा विभागीय अध्यक्ष फेरोज लाला यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील पदाधिकारी बिहारला रवाना झाले असून, अमौर विधानसभा मतदारसंघात (पूर्णिया जिल्हा) पक्षाच्या प्रचार मोहिमेला चालना देणार आहेत. या मोहिमेचा मुख्य केंद्रबिंदू एआयएमआयएमचे बिहार प्रदेश अध्यक्ष तथा अमौरमधील विद्यमान आमदार अख्तरुल ईमान साहेब यांचा पुनर्विचार आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत ईमान यांनी जनता दल (युनायटेड)च्या साबा झफर यांना ५२,५१५ मतांच्या फरकाने पराभूत करून (९४,४५९ मते मिळवून) ही जागा जिंकली होती.त्या निवडणुकीत एआयएमआयएमने सीमांचल पट्टीतील पाच जागा जिंकल्या होत्या, ज्यात अमौरचा समावेश होता. आता २०२५ च्या निवडणुकीतही पक्ष हा मतदारसंघ कायम ठेवण्यासाठी आक्रमक रणनीती आखत आहे, ज्यात जनसुराज पक्षाच्या अफरोज आणि काँग्रेसच्या अब्दुल जलील मस्तान यांच्याशी चार कोपऱ्यांची लढत अपेक्षित आहे. महाराष्ट्रातून या



प्रचारयंत्रणेचा एक प्रमुख चेहरा आहे बीड जिल्ह्यातील 'बीडचा भाऊ' म्हणून ओळखले जाणारे नेते. ते २०२१ मध्ये बिहार विधानसभा निवडणुकीसाठी प्रचारात सहभागी झाले होते आणि पक्षाच्या यशात मोलाची भूमिका बजावली होती. त्या वेळी एआयएमआयएमने पाच आमदार निवडून आणले, ज्यात ईमान यांचा समावेश होता. भाऊंनी दिलेल्या जबाबदाऱ्यांनुसार, यावेळीही ते बिहारसोबतच तेलंगणा, गुजरात आणि दिल्लीतील पक्षाच्या प्रचार मोहिमांमध्येही सक्रिय असतील. सीमांचलच्या मुस्लिम समाजाच्या हक्कांसाठी आणि विकासासाठी एआयएमआयएमची लढाई कायम आहे. महाराष्ट्रातून आम्ही पूर्ण ताकदीने साथ देत आहोत, असे भाऊ म्हणाले. प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर यांनी सांगितले, राष्ट्रीय अध्यक्षांच्या दृष्टिकोनानुसार, आम्ही स्थानिक मुद्द्यांवर - जसे पूरप्रवण भाग, शिक्षण आणि आरोग्य - लक्ष केंद्रित करत आहोत. इम्तियाज जलील साहेबांच्या नेतृत्वात महाराष्ट्र एकजुटीने बिहारच्या या लढ्यात सहभागी आहे. तर फेरोज लाला यांनी मराठवाडा विभागातून २०१९ पासून पक्षाच्या विस्तारात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, ते आता बिहारमधील प्रचारातही प्रमुख भूमिका बजावणार आहेत.

एआयएमआयएमने बिहारमध्ये मुस्लिम मतदारांच्या असंतोषाचा फायदा घेत २०२० मध्ये यश मिळवले होते. आता २०२५ मध्येही पक्ष 'मुस्लिम कार्ड' आणि स्थानिक मुद्द्यांवर जोर देऊन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहे निवडणूक आयोगानुसार, अमौर मतदारसंघात सुमारे ६०% मुस्लिम मतदार आहेत, जे ही लढत निर्णायक बनवू शकतात. या प्रचार मोहिमेमुळे एआयएम आयएमची राष्ट्रीय विस्ताराची रणनीती अधिक स्पष्ट झाली असून, बिहार विधानसभा निवडणुकीत (७ आणि ११ नोव्हेंबरला मतदान, १४ नोव्हेंबरला निकाल) पक्षाची भूमिका काय असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सिरसाळा येथे होणार अभूतपूर्व शेतकरी संवाद मेळावा!

- केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांची प्रमुख उपस्थिती ; हजारोंच्या संख्येने शेतकरी सहभागी होणार
- नियोजनासाठी गावोगावी बैठका ; कृषीकुल येथे अनेक गावांच्या सरपंचांची नियोजन बैठक

**परळी वै. । प्रतिनिधी**

ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांच्या प्रेरणा आणि संकल्पनेतून दिनांक ०७ नोव्हेंबर रोजी सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा संपन्न होत आहे. या कार्यक्रमास देशाचे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पशुसंवर्धन तथा दुग्धविकास मंत्री पंकजाताई मुंडे, खा.बजरंग सोनवणे, खा.रजनीताई पाटील, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्यासह मराठवाड्यातील सर्व आमदारांसह अनेक मान्यवर उपस्थित असतील. सदरील कार्यक्रमास राज्यातील ३५ ते ४० हजार शेतकरी उपस्थित राहणार आहेत. नियोजनासाठी गावोगावी शेतकऱ्यांच्या बैठका होत असून, परळी तालुक्यातील अनेक गावांच्या सरपंचांची कृषीकुल येथे महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

सिरसाळा येथे ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य शेतकरी संवाद मेळाव्याची तयारी पूर्णत्वास




आली आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणीच भव्य कृषी प्रदर्शनही भरवण्यात येत असून, कृषी क्षेत्राशी संलग्न असलेल्या आस्थापनांचे शंभर स्टॉल उभारण्यात आले आहेत. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा मेळावा अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक असा ठरणार आहे. केळी लागवडीसाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून शंभर कोटी, तुती लागवड करण्यासाठी शंभर कोटी तर फळबाग लागवडीसाठी शंभर कोटी रुपयांची मदत आर्थिक संस्थेच्या मार्फत शेतकऱ्यांना करण्याची घोषणा केली जाणार आहे. पारंपरिक शेती ही शेतकऱ्यांना न परवडणारी झाली आहे. या दुष्टचक्रातून बाहेर निघायचे असेल तर फळबाग लागवडीसारखा शाश्वत उपाय करावा लागणार आहे. त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शेतीकडे वाटचाल करावी लागणार आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण, शासन, प्रशासन आणि शेतकऱ्यांत सुसंवाद घडवणे तसेच आधुनिक शाश्वत शेतीसाठी भविष्यकालीन ठोस उपाययोजनांचा ऊहापोह या मेळाव्यात केला जाणार

# जमिनीच्या वादातून शेतकरी आणि त्याच्या मुलाची हत्या, दोघांना अटक

**लातूर । प्रतिनिधी**

लातूरमध्ये जमिनीच्या वादातून शेतकरी आणि त्याच्या मुलाची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अहमदपूर तालुक्यातील रुद्धा गावात दोघांचे मृतदेह सापडले असून दोघांना अटक केली आहे. हे दोघे पिता पुत्र असून सोमवारी रात्री ९:३० वाजता नेहमीप्रमाणे शेतातील झोपडीत झोपण्यासाठी गेले असता काहीच वेळाने हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांनी त्यांच्या चेहऱ्यावर, मानेवर आणि डोक्यावर अनेक वार केले. त्यानंतर हल्लेखोरांनी मृतदेह गावातील एका पाण्याच्या टाकीजवळ फेकून दिले. मंगळवारी सकाळी माहिती मिळाल्यानंतर पोलिस घटनास्थळी पोहोचले. पुरावे गोळा करण्यासाठी फॉरेन्सिक तज्ञ, श्वान पथक आणि इतर पथकांना पाचारण करण्यात




आले. जमिनीच्या वादातून शेतकरी आणि त्याच्या मुलाची हत्या केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी त्याच गावातील रहिवासी नरसिंग भाऊराव शिंदे (६०) आणि केरबा नरसिंग शिंदे (२२) यांना अटक केली, असे अधिकाऱ्याने सांगितले. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या वर्षी याच गावातील एका वृद्ध जोडप्यावर असाच हल्ला झाला होता.

# आता दुर्गम,अल्पसेवित भागांपर्यंत उपग्रहाधारित इंटरनेट सेवा पोहोचेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड (स्टारलिंक) आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागासमवेतच्या सामंजस्य करारामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. यामुळे राज्यातील दुर्गम आणि अल्पसेवित भागांपर्यंत उपग्रहाधारित इंटरनेट सेवा पोहोचविण्याची दिशा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड (स्टारलिंक) आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागासमवेत सामंजस्य करारावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. गोविंदराज, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद - सिंघल, उद्योग विभागाचे सचिव पी.अन्बलगन, मुख्यमंत्र्यांचे मुख्य गुंतवणूक व धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे, स्पेसएक्सच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लॉरेन ड्रेयर, स्टारलिंक लिमिटेड कंपनीचे प्रतिनिधी मनोज लाडवा, महाआयटीचे महाव्यवस्थापक मकरंद कुरतडीकर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव विरेंद्र सिंह यांनी स्वाक्षरी केली. यामुळे स्टारलिंकसोबत औपचारिक भागीदारी करणारे महाराष्ट्र भारतातील पहिले राज्य ठरले आहे.

# वाचनानंदाची दिवाळी; शासकीय विभागीय ग्रंथालयात दिवाळी अंक प्रदर्शन

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

दिवाळी अंक म्हणजे महाराष्ट्राच्या वाचन संस्कृतीचे वैशिष्ट्य. दिवाळीचा खमंग फराळ, आकाशदिवे, फटाके, फुलबाज्या, आप्तेष्टांच्या भेटीगाठींसोबतच मराठी मन दिवाळी अंकांसाठी उत्सूक असते. ह्याच दिवाळी अंकांचे प्रदर्शन शासकीय विभागीय ग्रंथालयात विनामूल्य सुरु आहे. दि.१० नोव्हेंबर पर्यंत हे प्रदर्शन वाचकांसाठ खुले राहणार आहे, असे छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी कळविले आहे.

समर्थ नगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रा.विष्णू सुरासे यांचे सोमवारी (दि.३) हस्ते करण्यात



आले. ज्येष्ठ साहित्यिक प्रशांत गौतम अध्यक्षस्थानी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, ज्येष्ठ पत्रकार सुधीर सेवेकर, अण्णा वैद्य, जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाहक गुलाबराव मगर, पी.यू. जैन शाळेचे मुख्याध्यापक विजय पाटोदी हे उपस्थित होते. प्रा. सुरासे यांनी दिवाळी अंकांचे व वाचनाचे महत्त्व विषद करून वाचन मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनणे गरजेचे असल्याचे सांगून त्यांनी याप्रसंगी हलक्या फुलक्या विनोदाने कार्यक्रमास रंगत आणली. या कार्यक्रमास शासकीय विभागीय ग्रंथालयाचे वाचक, सभासद तसेच शहरातील पी.यु.जैन शाळेचे शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथालय निरीक्षक आवजी गलांडे यांनी केले. दिवाळी अंकांचे हे प्रदर्शन दि.१० नोव्हेंबर पर्यंत कार्यालयीन वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले असून वाचनप्रेमी नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले

# पुणे जिल्ह्यात नरभक्षक बिबट्याला गोळ्या घालून ठार मारण्यात आले

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील शिरूर तहसीलमध्ये बिबट्याशी संबंधित संघर्ष आणि तीन मृत्यूंच्या वाढत्या घटनांमध्ये, शार्पशूटर्स आणि तज्ञांच्या पथकाने मध्यरात्रीच्या कारवाईत नरभक्षक बिबट्याला ठार



मारले. आठवड्याच्या शेवटी, शिरूर तहसीलमध्ये महाराष्ट्र वन विभागाविरुद्ध अनेक निदर्शने झाली, ज्यात एक वाहन जाळून टाकणे आणि पुणे-नाशिक महामार्ग रोखणे यांचा समावेश होता. मिळालेल्या माहितीनुसार बिबट्याच्या हल्ल्यात १२ ऑक्टोबर रोजी शिवन्या शैलेश बोंबे (५), २२ ऑक्टोबर रोजी भागुबाई रंगनाथ जाधव (७०) आणि २ नोव्हेंबर रोजी रोहन विलास बोंबे (१३) हे तिघे बळी पडले. या घटनांमुळे पुण्यातील जुन्नर, शिरूर, आंबेगाव आणि खेड तहसीलमधील रहिवाशांमध्ये व्यापक संताप आणि भीती निर्माण झाली आहे. हे प्रकरण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे नेण्यात आले.

# नाशिक जिल्ह्यात 14 वर्षीय मुलाचा ट्रकने चिरडल्याने मृत्यू

**नाशिर्क । प्रतिनिधी**

मंगळवारी सकाळी साक्री-शिर्डी महामार्गावरील लोहनेर गावाजवळ एक दुर्दैवी अपघात घडला, जिथे १४ वर्षीय रोशन समाधान आहेर याला बांधकाम मिक्सर ट्रकने चिरडले. या घटनेच्या निषेधार्थ, रोशनच्या नातेवाईकांनी देवळा पाचखंडील येथे रस्ता रोखण्याचा प्रयत्न केला.

देवळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांनी कडक कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन संपवण्यात आले. मिळालेल्या वृत्तानुसार, देवळा तालुक्यातील सटवाईचीवाडी येथील रहिवासी समाधान आहेर यांचा मुलगा रोशन आहेर (१४) हा लोहनेर येथील जनता विद्यालयात आठवी इयत्तेत शिकत होता. मंगळवारी सकाळी, वर्ग संपल्यानंतर, रोशन त्याच्या सायकलवरून घरी परतत असताना, लोहनेर-देवळा रस्त्यावर बांधकामासाठी काँक्रीट घेऊन जाणाऱ्या मिक्सर ट्रकने त्याला जोरदार धडक दिली.

# पुणे - भोंदूबाबाच्या नादात उच्चशिक्षित कुटुंब उद्ध्वस्त; मुलींना बरं करतो सांगत १४ कोटी उकळले; इंग्लंडमधील घर, शेती सगळंच विकलं

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना दिलेल्या तक्रारी अर्जानुसार, पीडित कुटुंबीय हे पती-पत्नी असून एका खासगी कंपनीमध्ये कामाला आहेत. त्यांना असलेल्या दोन्ही मुलींना व्याधी असल्यामुळे त्या आजारी असतात. त्यातील एका मुलीला अलुपेशीया नावाचा आजार असल्याने तिला कमी प्रमाणात केस येतात. या दांपत्याला भजनाची आवड असल्याने ते अनेक ठिकाणी कार्यक्रमासाठी जात असे. यावेळी त्या दोघांची दिपक जनार्दन खडके या व्यक्तीशी ओळख झाली. या दांपत्याच्या मुलींबाबत खडके यांना कळल्यानंतर त्याने त्यांची ओळख वेदिका कुणाल पंढरपूरकर व कुणाल पंढरपूरकर यांच्याशी करून दिली. यावेळी त्यांनी वेदिका शंकरबाबाची लेक असून तिच्या अंगात शंकरबाबा येतात. ते तुमची सर्व कामे करून देतील. तुमच्या मुलींचे आजार ठीक करतील तुम्ही निश्चिंत रहा असं सांगितलं. यानंतर खडके यांच्या एका दरबारात, या दांपत्याला जेव्हा वेदिका भेटली तेव्हा तिने अंगात शंकरबाबा आल्याचं सांगितलं. तसंच शंकर महाराजांचा अभिनय करून स्वतः शंकर बाबा बोलत असल्याबाबत भासवलं. यावेळी या दाम्पत्याकडे असलेली सर्व रक्कम माझ्याकडे द्या आणि मुलीचा आजार गंभीर असून दोष जास्त आहेत, त्यामुळे आजार बरा होण्यास कालावधी लागेल असं सांगून करोडो रुपये उकळले. यावरच न थांबता वेदिका नामक महिलेने पुन्हा एकदा शंकर महाराज यांचा अभिनय करून घर विका, शेती विका आणि पैसे जमा करा असं सांगून फसवणूक केली. मुली बऱ्या होतील या खोट्या आशेने या दांपत्याने परदेशातील घर सुद्धा विकलं आणि त्याचे पैसे या महिलेला दिले. पुढे या देविका नावाच्या महिलेने त्या दांपत्याला सुपारी, नारळ व दगड अशा वस्तू घरात ठेवण्यास सांगितल्या. शेवटचा पर्याय असल्याचे सांगून त्यांनी दांपत्याला राहते घर देखील विकण्यास भाग पडले. आपल्या मुली बऱ्या होत नसून गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेला हा सर्व प्रकार फसवणूक असल्याचं लक्षात आल्यानंतर दांपत्याने पोलिसांकडे धाव घेतली आहे. दाम्पत्याने याप्ररकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आम्हाला खोटी माहिती देऊन. अंगात शंकर बाबा येतात असं भासवून विश्वास केला. खोट्या भूलथापा देऊन, आश्वासन देऊन आमच्या मिळकती विकण्यास सांगून सदरची रक्कम त्यांचे खात्यामध्ये जमा करण्यास सांगून आमची १३ ते १४ कोटी रुपयांची फसवणूक केली असल्याची तक्रार त्यांनी केली आहे.

# ऊसतोड कामगार : मुलांचे भविष्य कुठे हरवले?

रात्रीचे बारा वाजले होते. कळंब कडून वापस येताना सारणी सांगवी गावामध्ये आमचे मित्र गफूर भाई यांना सोडवण्यासाठी मी आणि माझे मार्गदर्शक नितीन ताटे ( बप्पा ) आम्ही गावांमध्ये गेलो होतो, वापस येत असताना गाडी मधूनच फोटो काढले फोटो काढायचा कारण असं की बारा वाजेच्या दरम्यान असे चित्र पाहायला मिळते. ही चित्रे आमदार खासदारापर्यंत पोहोचावी हीच मनात इच्छा ठेवून टिपलेले हे छायाचित्र आहे. गाडीतून उतरून फोटो काढावा तर त्या ठिकाणचे कामगार फोटो काढू देणार नाहीत या उद्देशाने खाली उतरून फोटो काढला नाही पण त्यांच्या अंधाराच्या पडद्यामागे दिसत होती एक वेगळीच दुनिया. रस्त्याच्या कडेला ट्रॅक्टरचे लाईट लागलेले, आणि त्यात उसाचे ढीग भरत असलेले काही चेहरे थकलेले, पण जगण्यासाठी लढणारे. ते ऊसतोड कामगार होते.दिवस रात्र न पाहता, उन्हातान्हात, पावसात आणि थंडीतही ते घाम गाळतात. प्रत्येक उसाच्या कांड्यामागे त्यांचा एक तुकडा आयुष्याचा मिसळलेला



असतो. पण मला निम्म्या रात्री प्रश्न असा पडला की त्या ऊसतोड कामगारांच्या मुलांचे काय ?

आजही हजारो ऊसतोड कुटुंबं आपला संसार हातातल्या हत्यारांवर म्हणजेच कोयत्यावर चालवतात. कामाच्या मागे मुलांचे शिक्षण, त्यांचे बालपण, आणि त्यांचे स्वप्न साखरेप्रमाणे विरघळून जातात. शाळा बंद, वही रिकामी, आणि भविष्यात फक्त उसाचा ढीग उरतो. एखाद्या ऊसतोड मजुरांचा एका उसाच्या कांड्यामध्ये मुलाचं भविष्य लपलेलं असतं. आई ऊसतोड कामगार करतात मग गावाकडे राहायचं कुठे हा प्रश्न सतवत असतो यामुळे आई-बाबा बरोबर जाऊन तिकडेच मन रमून जातं. एखाद्या आई-बाबाला विचाराव तर आईचे उत्तर.... साहेब, आमचं मूल शाळेत गेलं तर खायचं कोण ? आणि आम्ही कामाला गेलो नाही तर जगायचं कसं ?

ही वाक्यं कानावर पडली की मन पिळवटून जातं. कारण ती आई आपल्या लेकरासाठी जगते, पण तेच लेकरं शिक्षणापासून वंचित राहतात. आजही ऊसतोडीच्या शिबिरात जन्म घेणारे कित्येक लहानगे शाळा कधी पाहतच नाहीत. त्यांच्या हातात पेनऐवजी हत्यार येतं. शिक्षकाऐवजी 'मुकादम' हा त्यांचा गुरू बनतो. सरकारच्या योजनांच्या पानांवर त्यांचं भविष्य लिहिलं गेलं आहे, पण प्रत्यक्षात त्यांच्या पायातली बेडी कोणी तोडली नाही. जे ऊस गाळण्यासाठी जातात, त्यांचा स्वतःचा गाळलेला काळ कोणी पाहत नाही. आपण मध्यरात्री आरामात झोपतो, पण त्याच वेळी कुणीतरी उसाच्या शेतात काम करत असतो. त्यांचा घाम आपल्या चहात साखरेप्रमाणे मिसळलेला असतो पण त्याची किंमत मात्र त्यांना मिळत नाही. आज गरज आहे ती फक्त दया नाही तर न्याय आणि संधीची.

त्यांच्या लेकरांना शाळेत नेणं, शिक्षण देणं, आणि ऊसाच्या कांड्यांऐवजी पेन हातात देणं हीच खरी सेवा, हीच खरी समाजकारणाची परीक्षा..

ऊसतोड कामगाराच्या लेकराचं बालपण जपलं, तरच उद्याचं भविष्य उजळेल.

**- अभिजीत पवार**
**( दैनिक बीड माऊली संपादक )**
**९३७३९५६७२७**

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरुवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### बालाजी भगवान शेष वाहन शोभायात्रा आज

**बीड । प्रतिनिधी**

बालाजी मंदिर संस्थान बीड येथे सुरू असलेल्या ब्रम्होत्सवाच्या निमित्ताने आज (गुरुवार, दि. ०६ नोव्हेंबर २०२५) रोजी बालाजी भगवानांचे शेष वाहन शोभायात्रा मोठ्या उत्साहात निघणार आहे. ही शोभायात्रा सायंकाळी ७:३० वाजता निघणार असून, रात्री ९:०० वाजता आरती होईल. आरतीनंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचा सर्व भक्तांनी लाभ घ्यावा, असे बालाजी मंदिर संस्थान बीड व ब्रम्होत्सव समिती यांनी केले आहे

### अल्पवयीन मुलीचे अपहरण ;तरुणावर गुन्हा

**केज । प्रतिनिधी**

एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेत अपहरण केल्याची घटना केज ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणी एका २३ वर्षीय तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. केज तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही २६ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास घरातून बाहेर शौचास गेली होती. ती परत घरी न आल्याने तिच्या आई - वडिलांनी तिचा नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र तिचा तपास लागला नाही. तर सतीश भागवत शिंदे (रा. बोरगाव (बु.) या २३ वर्षीय तरुणाने या अल्पवयीन मुलीस पळवून नेत अपहरण केल्याची तक्रार मुलीच्या वडिलांनी केज ठाण्यात दिली. या तक्रारीवरून सतीश शिंदे विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनात जमादार बाबासाहेब बांगर व गोविंद मुंडे हे तपास करीत आहेत.

### शेख मुनज्जा फातिमाने लॉन टेनिसमध्ये जिल्हा पातळीवर दुसरा क्रमांक पटकावला



**बीड । प्रतिनिधी**

मिल्लिया गर्ल्स हायस्कूल व ज्युनियर कॉलेजची नववी इयत्तेत शिकणारी मुनज्जा फातिमा शेख नजीर हिने बीड जिल्हा शालेय क्रीडा स्पर्धेत १७ वषारखालील गटात लॉन टेनिसमध्ये बीड जिल्हा पातळीवर दुसरा क्रमांक पटकावला आहे. आणि तिची विभागीय स्तरावरही निवड झाली आहे. या यशाबद्दल अंजुमन ईशात तालीम बीडच्या सचिव साहिबा खान सबिहा बेगम मिल्लिया गर्ल्स स्कूलचे प्राचार्या सिद्दीकी इरफान सादुल्लाह, उपमुख्यध्यापक खुर्शीद अहमद पर्यवेक्षक नसरीन फआणि सर्व शिक्षक व शिक्षकांनी तिचे अभिनंदन केले. आणि अशाच प्रकारे यश मिळावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

### व्हॉट्सअ‍ॅपवरील बनावट फाईलद्वारे मोबाईल हॅक

**व्यापाऱ्याची ९७ हजार ५०० रुपयांची फसवणूक**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

व्हॉटसअ‍ॅपवर आलेल्या एपीके फाईलवर क्लिक केल्याने मोबाईल हॅक होऊन खात्यातील ९७ हजार ५०० रुपये गमावल्याची धक्कादायक घटना अंबाजोगाईतील गुरुवार पेठ भागात समोर आली आहे. या प्रकरणात अनोळखी सायबर गुन्हेगारांविरुद्ध बीड सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झाली आहे. निलेश प्रकाश मुथा (रा. गुरुवार पेठ, अंबाजोगाई) यांनी तक्रार दिली आहे. निलेश मुथा यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता त्यांनी व्हॉटसअ‍ॅप उघडले असता मित्र विनोद काबरा यांच्या मोबाईल क्रमांकावरून मिळालेली ‘Wedding Invitation Card.apk’ नावाची फाईल त्यांनी उघडली. फाईल ओपन करताच त्यांचा मोबाईल हॅक झाला. संध्याकाळी त्यांच्या सिमकार्डचे दुसऱ्या डिव्हाइसवर लॉगिन झाल्याचा संदेश आला आणि माय जिओ तसेच युपीआय ॲक्टिव्हेशनची सूचना मोबाईलवर मिळाली. त्यानंतर रात्री ११ ते पहाटे १.३० या वेळेत बँक ऑफ बडोदा खात्यातून सलग १२ ट्रान्झॅक्शनद्वारे ९७,५०० रुपये वळते केल्याचे उघड झाले. मुथा यांनी तत्काळ बँक कॉल सेंटरशी संपर्क साधला तसेच १९३० सायबर हेल्पलाईनवर तक्रार नोंदवली. दुसऱ्या दिवशी बँकेत जाऊन खाते तपासले असता फसवणूक झाल्याची खात्री पटली. या प्रकरणी अज्ञात सायबर गुन्हेगारांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सायबर पोलीस बीड करीत आहेत. सायबर पोलिसांनी नागरिकांना अनोळखी .apk फाईल्स, लिंक व मेसेज उघडू नये, मोबाईलचा सिक्युरिटी बॅकअप ठेवावा आणि संशयास्पद सायबर हालचालींवर त्वरित १९३० वर कळवावे, असे आवाहन केले आहे.

### पावणे तीन लाखांची चोरी ऑक्टोबर महिन्यात अन् फिर्याद नोव्हेंबर महिन्यात !

**आष्टी । प्रतिनिधी**

रेन्यु विथ एनर्जी कंपनीच्या वेल ८ या मशिनच्या १३ केबलचे नुकसान करून दोन केबलची अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना १९ ऑक्टोबर रोजी घडली असुन याप्रकरणी १ नोव्हेंबर रोजी अंभोरा पोलिस ठाण्यात अज्ञात चोरटय़ांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कंपनीचे अधिकारी,कर्मचारी एवढे दिवस नेमकं काय करत होते. असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. आष्टी तालुक्यातील देऊळगाव घाट येथील रेन्यु विथ एनर्जी कंपनीच्या वेल ८ या मशीनच्या १३ केबल चे नुकसान करून पावणेतीन लाख रूपयांचे दोन केबलची अज्ञात चोरट्यांनी १९ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या दरम्यान चोरी केली असून या प्रकरणी १ नोव्हेंबर रोजी अंभोरा पोलिस ठाण्यात विशाल दिनकर पालवे खाजगी कर्मचारी यांच्या फिर्यादीवरून १ नोव्हेंबर रोजी अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वास्तविक पावणेतीन लाखांच्या केबलची चोरी कंपनीच्या अधिकाऱ्याना तब्बल १२ दिवसांनी लक्षात आली असून एवढे दिवस नेमकं अधिकारी,कर्मचारी काय करत होते.असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.तर ही चोरी झाली तेव्हा सुरक्षा रक्षक नव्हते की असून झोपा काढत होते.याची देखील चौकशी होणे आवश्यक आहे.आजवर कंपनीच्या किंवा शासकीय साहित्यांच्या अनेक चोरीच्या घटना घडल्या आहेत.मग चोरी झाल्यानंतर तात्काळ फिर्याद का दिली जात नाही.लाख मोलाचे साहित्य असताना यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले गेले नाहीत का ?हा संशोधशाचा विषय आहे.

# केंद्रीय पथकाचा बीड जिल्हा दौरा : अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी





**● जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात नुकसान**

**जिल्ह्यातील ८ लाख ६ हजार शेतकऱ्यांचे सुमारे ७ लाख १३ हजार हेक्टर क्षेत्र पावसाने बाधित झाले असून, आतापर्यंत ५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली आहे तर ४४५ कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम वितरित करण्यात आली आहे . अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात १ ,००० पेक्षा अधिक जनावरांचे प्राण गेले, १,३१३ घरांचे संपूर्ण किंवा अंशतः नुकसान झाले आणि ७,४७२ सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान झाल्याचे जिल्हा अहवालात नमूद आहे .सार्वजनिक मालमत्तांना देखील मोठी झळ बसली आहे. बांधकाम विभागाचे रस्ते आणि पुलांचे, महावितरणचे खांब व वीजवाहिन्यांचे तर महामार्ग, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, अंगणवाडी व ग्राम पातळीवरील पायाभूत सुविधा या सर्वांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे.**

**बीड । प्रतिनिधी**

अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे बीड जिल्ह्यात झालेल्या मोठ्या नुकसानीची पाहणी केंद्रीय पथकाने (५ नोव्हेंबर) केली. पथकात एसव्हीएसपी शर्मा, विशाल पांडे यांचा समावेश होता. पथकाने विविध गावांमधील नुकसानीची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि नुकसानीचा अंदाज घेतला. पथकाच्या दौऱ्यात नोंदवलेल्या नुकसानीच्या प्रकारानुसार, अनेक ठिकाणी शेतीचे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे.

दौऱ्याची सुरुवात बीड तालुक्यातील लिंबा रुई येथून झाली, जिथे शेती, पीक आणि जमीन खरडून जाणे, तसेच विहिरी गाळाने भरणे अशा स्वरूपाचे नुकसान आढळले. शिरूर कासार तालुक्यातील येवलवाडी येथे पूल आणि रस्ता वाहून गेल्यामुळे दळणवळणाचे मोठे नुकसान झाले आहे. कारेगाव (ता. शिरूर), घाटपिंपरी, देवळाली (ता. आष्टी)येथे देखील जमीन खरडून जाणे आणि शेती पिकाचे मोठे नुकसान झाल्याची नोंद घेण्यात आली. घाटापिंप्री येथे जमीन खरडून जाण्याचे तर देवळाली येथे फळबाग नुकसानीचे प्रमाण मोठे असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. पाहणी दौऱ्या दरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव, ▶▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा जिल्हा परिषद गटात गोड ऊसाची कडु चव ऊमेदवाराच्या चर्चेने मतदारात मात्र गवगव!



**तलवाडा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील विविध नगर परिषद व नगर पालिका निवडनुकिचे वारे वाहु लागलेले आसतांनाच आणेकांना जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडनुकित आपणच सदस्य होणार आसल्याचे दिवसा स्वप्न पडु लागले आसतांना तालुका स्तरिय नेते मंडळी कडुन देखील आणेक ऊमेदवारांचे नावे समोर येत आसल्याने कोणत्या पक्षाच्या ऊमेदवार कोण हा मुद्दा गौण आसला तरी गत निवडनुका व त्या त्या निवडनुकिचा या भागातील आणुभव मतदाराच्या म्हणण्या नुसार हा गट आत्ता पर्यंत विकासाच्या बाबतीत सलाईनवरच राहिलेला आहे परत तलवाडा गाव व गट सलाईनवर नको या गु-हाळाच्या चर्चेने तलवाडा गाव व परिसरात मात्र गवगव जाणवत आसल्याचे चित्र सर्वत्र पहावयास मिळत आहे. तलवाडा गाव व गटातील होऊ घातलेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्रराज्य युवक प्रदेशाध्यक्ष पदी रोहन गलांडे पाटील यांची नियुक्ती!



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील रोहन गलांडे पाटील यांची अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्रराज्य युवक प्रदेशाध्यक्ष पदी, सचिव चंद्रकांत दादा जाधव व कार्याध्यक्ष सतिष पवार पाटील यांच्या शिफारशीनुसार अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ संस्थापक अध्यक्ष शिवश्री प्रल्हाद दादा गुळभिले पाटील यांच्या आदेशानुसार नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली आहे तरी ▶▶ उर्वरित पान २ वर

## माजलगावातील पेट्रोल पंपांवरील मोफत मिळणारी हवा झाली फुस्स !

**अनेक ठिकाणची हवेची यंत्रे बंद स्थितीत; पेट्रोल पंपावर मिळणाऱ्या इतर सुविधेची तपासणी करा**

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील आणि ग्रामीण भागातील बहुतांशी पेट्रोल पंपांवरील मोफत हवा देणारी यंत्रे बंद पडल्यामुळे वाहनचालकांची कुचंबना होत आहे. 'मोफत हवा' ही केवळ फलकावर राहिलेली असून प्रत्यक्षात हवा मिळवण्यासाठी ग्राहकांना दुकानात जाऊन पैसे देऊन हवा भरावी लागत आहे. बोटावर मोजण्याइतके पंपच मोफत सेवा देत असल्याचे चित्र आहे. या सर्व परिस्थितीकडे संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष आहे का? हा प्रश्न आता ठळकपणे पुढे येत आहे. अनेक पंपांवर हवा मशीन बंद असून, ग्राहक विचारणा करताच मशीन खराब आहे, लाईट नाही, अशा सबबी देण्यात येतात. काही ठिकाणी मशीन असल्याचे दाखवले जाते पण त्यातून हवा निघत नाही. या दुर्लक्षामुळे वाहनचालकांना जवळपासच्या दुसऱ्या पंपावर जावे लागते आणि वेळ, इंधन, मनःस्ताप याचा खर्च त्यांनाच करावा लागतो. महिनोनमहिने ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिवराजसिंह चौहान यांच्या सिरसाळा येथील शेतकरी संवाद मेळाव्यावर बहिष्कार टाका

**सिरसाळा । प्रतिनिधी**

शेतकरी आत्महत्यांचा कलंक पुसण्यासाठी मोदी सरकारने कुठलीही ठोस उपाययोजना केली नाही.विदेशातून शेतीमालाची आयात करुन शेतीमालाचे भाव पाडले जात आहेत.उत्पादन वाढीसाठी जी.एम. तंत्रज्ञानाला बंदी घातली आहे. उत्पादन वाढीच्या नावाखाली शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात असल्याने सिरसाळा ता.परळी येथे केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या उपस्थितीत होणाऱ्या शेतकरी संवाद मेळाव्यात शेतकऱ्यांनी सहभागी होवू नये, कार्यक्रमावर बहिष्कार घालावा असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष तथा भारतीय किसान संघ-परिसंघ नवी दिल्लीचे सचिव कालिदास आपेट यांनी केले आहे.

मोदी सरकारचे कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान हे मध्यप्रदेशचे सलग वीस वर्ष मुख्यमंत्री होते.मध्यप्रदेशातील शेतमजूर दरवर्षी ऊस तोडणी, सोयाबीन काढणी आणि कापूस वेचणीसाठी लाखोंच्या संख्येने महाराष्ट्रात येतात. मध्यप्रदेशातील शेतमजुरांना रोजगाराची व्यवस्था त्यांना करता आलेली नाही.संतोष देशमुख खून प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडच्या निगराणीखाली राज्याच्या तत्कालीन कृषीमंत्र्यांनी परळी वैजनाथ येथे कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले होते. तेंव्हा कौडगाव घोडा येथील अनिल कांडके आणि लोणी येथील धनंजय राऊत या शेतकऱ्यांनीअतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाल्याने आत्महत्या केल्या. त्याकडे दुर्लक्ष करून ▶▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्याचे आर्थिक जीवन भाजपच्या सरकारने उध्वस्त केले : वसंत मुंडे



**परळी । प्रतिनिधी**

भाजपच्या सरकारने जाहीर केलेला शेती मालाला बाजारपेठेत आधारभूत हमीभाव मिळत नसल्यामुळे केंद्र व राज्यातील सरकारचे आयात निर्यात धोरण शेतकऱ्याच्या शेतीमाला बाबत चुकीचे असल्यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक जीवन उद्ध्वस्त केल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. शेतकऱ्याकडे शेतीमाल तयार झाला की परदेशातून शेतीमाल व्यापाऱ्या मार्फत आयात केला जातो, व्यापाऱ्याकडून संबंधित मंत्री अधिकारी यांना टक्केवारी मिळते. शेतकऱ्याच्या तयार झालेला शेतीमाल बाजारपेठेत कमी दरामध्ये खरेदी विक्री व्यवहार करून आर्थिक दृष्ट्या शेतकऱ्याचे जीवन संपवणे हे मोठे भाजपच्या सरकारचे धोरण आहे . केंद्र व राज्य सरकारचे बाजारपेठेवर नियंत्रण नाही

दैनंदिन संपूर्ण अहवाल कृषी खाते अधिकारी मंत्री तपासत नाहीत ▶▶ उर्वरित पान २ वर

## चेक बाउन्स प्रकरणी आरोपीस दोन लाख पन्नास हजार रुपये दंड



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दिनांक ३१-१०-२०२५ रोजी चेक बाउन्स प्रकरणांत आरोपी रुपेश राजेंद्र शेळके राहणार बीड यांस दोन लाख पन्नास हजार रुपये दंड आणि सदरचा दंड न भरल्यास ३ महिने कारावासाची शिक्षेबाबत आदेश केला आहे. बीड येथील जालना रोडवरील श्री. माऊली मेडीकल अँड जनरल स्टोअर्स यांच्यासाठी वैद्यकीय सामान उपलब्ध करून देणेकरीता आरोपी रुपेश राजेंद्र शेळके यांनी रक्कम १,९८,०००/- रुपये (अक्षरी एक लाख आठ्ठ्यांणव हजार रुपये) दि.२७ जुलै २०२० रोजी घेतले होते. परंतु अनेक महिने मेडीकल सामान उपलब्ध करवून देता न आल्याने घेतलेले पैसे परतफेड करण्याकरीता रुपेश शेळके यांच्यामार्फत सेंट्रल बँक ▶▶ उर्वरित पान २ वर

## लोकशाही पत्रकार संघाच्या प्रदेश उपाध्यक्ष पदी नवनाथ अण्णा शिराळे (पाटील) यांची निवड



**बीड । प्रतिनिधी**

लोकशाही पत्रकार संघाच्या राज्य प्रदेश उपाध्यक्ष पदी नवनाथ अण्णा शिराळे (पाटील) यांची निवड मार्गदर्शक विजेंद्रसिंह डूलगच,संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंखे, प्रदेश अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र निलोफर शेख, पश्चिम महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष हलिमा शेख,प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब खान, प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी, वसीम आजाद,साजेद सय्यद, डॉ. प्रा. सोपान सुरवसे, प्रदेश उपाध्यक्ष डिझिटल मीडिया चे नितेश उपाध्ये यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर यांनी जाहीर केली. या निवडीच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी स. अ. बीबी वैद्य हे होते. तर यावेळी व्यासपीठावर मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ, जेष्ठ पत्रकार कचरे, डिजिटल मीडियाचे प्रदेश उपाध्यक्ष नितेश उपाध्ये, बीड शहर बचाव मंच चे स. अ. नितीन जायभाये, बीड जिल्हा अध्यक्ष शिक्षण विकास समिती बबन आंधळे, कुंभार समाज विकास संस्थेचे सचिव कैलास कुंभार, बीड जिल्हा अध्यक्षा तक्षशिला सोनवणे, देवडकर मॅडम,बीड जिल्हा उपाध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट, बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी, बीड तालुका संघटक राजू अडागळे,आदी उपस्थित होते.

या निवडीच्या प्रसंगी मनोगत व्यक्त ▶▶ उर्वरित पान २ वर